

# 'तथापि'चा जिव्हाळा

प्रिय साथी,

निवडणुकीच्या रणधुमाळीत वेळ झाला तर जिव्हाळ्याचा अंक वाचा आणि तुमच्याकडचा गोंधळ आम्हालाही कळवा. सगळीकडे नुसतं निवडणुकीचंच वातावरण आहे सध्या. प्रचाराच्या रिक्षा, स्पीकर, पत्रकं आणि होर्डिंग...नुसती धामधूम. कुणी गर्दी जमवायला जेवणं घालतंय तर कुणी ताटं-वाट्या वाटतंय. आमच्या मैत्रिणीच्या घरी चार बायांचे चार थर्मास जमा झालेत. पुढचं वर्षभर चहा पिताना तरी उमेदवाराची आठवण निश्चित येईल त्यांना.

वस्तीमध्ये अशी गत तर दुसरीकडे मोठ्या इमारती नव्या रंगात रंगतायत् आणि चांगले पक्के रस्ते खणून काँक्रीटचे थर बसतायत्. सगळ्यांची सोय आहे या शिमग्यात. गावानी जेवणं चालू आहेत आणि शहरात दारूला पूर आलाय. यामध्ये जो किंवा जी सर होईल तो किंवा ती होणार 'लोक प्रतिनिधी'. मतासाठी काहीही करायला तयार असणारे उमेदवार आणि प्रचाराची नस सापडलेले मतदार...मजा आहे. तात्पुरता रोजगार म्हणून प्रचार करणाऱ्या बाईला चार पैसे जास्त मिळतायत् आणि बेरोजगार तरुणांना रोजचा काही तरी उद्योग.

बायांच्या, गरिबांच्या, दलितांच्या, शोषितांच्या आयुष्याचा विचार करणारा/री, त्यांच्या आयुष्यात फरक पाडेल असं राजकारण करणारा/री कुणी उमेदवार सापडली तर आम्हालाही कळवा. जिव्हाळ्यातर्फे त्यांना आधीच मनापासून शुभेच्छा!

आपली, तथापि टीम

## अंतरंग


**मागोवा**

जातीय हिंसा रोखण्यात महाराष्ट्र यशस्वी होईल? २

**वाचकांसाठी आवाहन** ४

**पारगावच्या पारावरुन**

जिल्हा परिषद काय म्हन्ती? ५

**शरीर साक्षरता**

गर्भाशय आणि गर्भ वाढवण्याची 'सेवा' भाड्याने? ८

**अनुभव**

ज्योतीची गोष्ट १०

तथापिची प्रकाशने सवलतीत उपलब्ध ११

होळी रे होळी १२




मा गो वा

# जातीय हिंसा रोखण्यात महाराष्ट्र यशस्वी होईल?

## शहाजी गडहिरे

*स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रात दलित महिला, आदिवासी व कमजोर घटकांवर अन्याय, अत्याचार होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. गावरहाटीत अजूनही तीव्र भेद आणि हिंसेला दलित समाजाला तोंड द्यावं लागत आहे. परंतु इतक्या सगळ्या घटना घडत असूनही त्या गुन्हेगारांना कडक शासन तर होत नाहीच पण नवे गुन्हे होणार नाहीत असा वचकही गावात निर्माण होत नाही.*

*नुकत्याच घडलेल्या दलितांवरील अत्याचाराच्या दोन घटनांच्या संदर्भात हा लेख. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवा.*

सामाजिक न्यायाचे केंद्रस्थान, परिवर्तनवादी, पुरोगामी आणि फुले, शाहू , आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून महाराष्ट्राची वाहवा केली जाते. विशेषतः इथले राज्यकर्ते स्टेजवर वाहवा करण्यात नेहमीच पुढे असतात. फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेऊन सत्ता मिळवायची, सतेच्या जोरावर दलितांचे, कमजोरांचे शोषण करायचं, कार्यकर्त्यांच्या गुंडगिरीला पाठीशी घालायचं; महाराष्ट्राच्या राजकारणात हे वेगानं सुरू आहे. आपल्या पक्षाचे कार्यकर्ते हे गावात आदर्श नागरिक कसे घडतील याबाबतचा कार्यक्रम एकाही राजकीय पक्षाकडे नाही. आपल्या पक्षाचे कार्यकर्ते सज्जन नागरिक आहेत का? निधर्मवादी, निगर्वी आहेत का? स्त्री पुरूष समानता मानणारे आहेत का? आपले कार्यकर्ते शाश्वत सामाजिक मूल्ये जोपासणारे आहेत का? याबाबत राजकारणात कोणी एक प्रश्नही विचारायला तयार नाही. गावागावात राजकियीकरण आज मोठया प्रमाणात झालेले आहे. पण हे राजकियीकरण मूल्याधिष्ठित आहे का? याचा शोध घ्यायला एकाही राजकीय पक्षाला वेळ नाही. ही चिंतेची बाब आहे. त्याचा परिणाम म्हणजे आज दलित, महिला, आदिवासी व कमजोर घटकांवर अन्याय, अत्याचार शोषणाचे प्रमाण झपाट्याने वाढतेय.

जानेवारी महिन्यात महाराष्ट्राला स्वतःला पुरोगामी म्हणवून घेण्याची लाज वाटावी अशा दोन घटना घडल्या. पहिली घटना ८ जानेवारी २०१२ रोजी रेजेगांव चिंचोली ता. गेवराई जि. बीड येथे घडली. शहादेव मसाराम तायडे वय ३५ या दलित समाजातील ऊसतोड मजुराला त्याच्या अंगावर रॉकेल ओतून त्याचा मुकादम वशिष्ठ डाके याने पेटवून दिले. प्रचंड भाजलेल्या अवस्थेत शहादेवला बीड येथील जिल्हा रूग्णालयात दाखल केले. परंतु दुसऱ्याच दिवशी शहादेवचा मृत्यू झाला.

दुसरी घटना ९ जानेवारी रोजी मुळगांव ता पाटण जि. सातारा येथे घडली. मातंग समाजातील एका महिलेच्या मुलाचे प्रेम गावातील सवर्ण कुटुंबातील मुलीसोबत होते. आपल्या प्रेमाला गावात साथ मिळणार नाही, गावात आपणाला जगू देणार नाहीत या भीतीपोटी मुलामुलीने एकमताने गाव सोडून जाण्याचा निर्णय घेतला. डिसेंबर महिन्यात दोघे स्वतंत्रपणे गाव सोडून निघून गेले. याचा प्रचंड राग गावातील सवर्णांना आला. त्यांनी मुलाच्या आईला बेदम मारहाण केली. तिच्यावर आता दवाखान्यात उपचार सुरू आहेत. गंभीर मारलेल्या अवस्थेतही तिची तक्रार पोलिसांनी नोंदवून घेतली नाही आणि सरकारी दवाखान्याने पुरेसे उपचार दिले नाहीत.

वरील दोन्ही घटनांकडे पाहिले असता त्या व्यक्तिगत द्वेषातून नाहीत तर जातीय वर्चस्ववादातून घडल्या आहेत हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारत प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले. १९५० पासून भारतीय समाज हा समतेवर आधारलेला आहे असे सांगितले जाते पण ते वरवरचे वाटते. कारण गेल्या ६०-६१ वर्षात समताधिष्ठीत समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेत इथल्या जातदांडग्या अन् धनदांडग्यांकडून अडथळे निर्माण

केले जात आहेत. त्याच्यावर उपाय काय हा प्रश्न माझ्या सारख्या कार्यकर्त्याच्या मनात सातत्याने उभा राहातो.

दलित आदिवासींवरील सवर्णाचे अत्याचार रोखण्यासाठी माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी १९८९ मध्ये अनु. जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (अॅट्रॉसिटी अॅक्ट) अस्तित्वात आणला. तरीसुध्दा गेल्या २२ वर्षामध्ये दलितांना जाळून मारण्याच्या, बलात्कार, छेडछाड, शोषण मारहाण जातीवाचक शिविगाळ इ.च्या घटना कमी होण्याऐवजी त्या वाढतच आहेत. अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी काही प्रयत्नही होतायत पण समाजमन झपाट्याने बदलायला तयार नाही. गावात एकोपा रहावा,सामाजिक न्याय प्रस्थापित व्हावा म्हणून महाराष्ट्रात तंटामुक्त समित्या स्थापन करण्याचा कार्यक्रम सुरू झाला. आणि पुन्हा एकदा गावातील अन्यायाचे, अत्याचाराचे निवाडे गावाच्या हातात आले. गावाच सर्वात जास्त अन्याय अत्याचार दलितांवर, महिलांवर होतात पण या घटना जशा चावडीवर येवू दिल्या जात नाहीत त्याच प्रकारे दलितांच्या केसेस तंटामुक्त समितीच्या अजेंडयावर येवू दिल्या जात नाहीत. गावाला तंटामुक्त पुरस्कार मिळावा यासाठी अनेक गंभीर घटना गावातच दाबल्या जातायत.

अॅट्रॉसिटी अॅक्टला विरोध करणारी, त्याला न जुमानणारी टाळकी गावागावात सक्रीय आहेत. संधी मिळताच अत्याचाराला ती पुढे येतात. दलित अत्याचाराच्या घटनांचा सन २००४ ते २००९ या कालावधीतील अंदाजे आकडा तपासला तर असे दिसते की, या पाच वर्षात दलितांवर ५३०० अत्याचार झाले आहेत. त्यापैकी ४४५ बलात्कार ८७१ सामूहिक हल्ले, ९४ खून, ९७६ विनयभंग अशी आकडेवारी आहे. आणि अर्थात हे सर्व नोंदवलेले गुन्हे आहेत.

महाराष्ट्रातील आदिवासींवर वरील पाच वर्षात १३६० अत्याचार झाले आहेत. त्यापैकी ४२ खून ३७८ बलात्कार अशा घटना घडल्या आहेत. महाराष्ट्रात आरोपीना शिक्षा होण्याचे प्रमाण केवळ २.६५% आहे. हेच प्रमाण राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश येथे ६० ते ७०% आहे. याचा नीट विचार केला तर असे दिसते की, महाराष्ट्रात अत्याचाराची योग्य नोंद पोलिस स्टेशनाला होत नाही. पुरावे मिळत नाहीत, मिळू दिले जात नाहीत. पुढाऱ्यांचा प्रचंड हस्तक्षेप ही कारणे शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असण्याची आहेत. आरोपीना निर्दोष सुटण्याचे मार्ग मोकळे करणारे घटक सक्रीय होतात. त्यामुळेही न्याय मिळण्यात अडथळे येतात. म्हणून यापुढे मुळगांव, रेजेगांव, चिंचोली सारखे प्रकार घडू नयेत यासाठी तातडीने पावले उचलली पाहिजेत. त्यामध्ये ज्या गावात अशी घटना घडली असेल तेथील ग्रामपंचायत बरखास्त करणे, पोलीस पाटील बडतर्फ करणे, तंटामुक्त समिती बरखास्त करणे हे तातडीने घटना नोंद झाल्यापासून २४ तासाच्या आत होणे आवश्यक आहे. राज्य स्तरावर स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा, जिल्हानिहाय विशेष न्यायालये सुरू करावीत, अत्याचारग्रस्तांना तातडीने पोलिस संरक्षण व आर्थिक सहाय्य मिळावे, स्वंतत्र सक्षम पोलिस यंत्रणा सक्रीय करावी असे काही उपाय करण्याची गरज असून समाजाची मानसिकताही बदलण्याची गरज आहे. शासनाने यापुढच्या काळात गावात केवळ वरवरच्या आर्थिक विकासाच्या योजनांच्या घोषणा करत राहण्यापेक्षा सामाजिक विकासाचे कार्यक्रम राबवण्यास प्राधान्य देण्याची गरज आहे. सोबतच अशा कार्यक्रमाचा केवळ राजकीय फायद्यासाठी वापर होणार नाही याचीही दक्षता घेतली पाहिजे.

राजकीय पक्षांना किंवा पुढाऱ्यांना निवडणुकीच्या काळात जशी आचारसंहिता लावली जाते तशी इतर वेळाही लावली जावी म्हणजे त्यांचा हस्तक्षेप वाढणार नाही.

जातीय द्वेषातून होणारे अत्याचार कमी करण्यामध्ये,जाती तोडणाऱ्यांचे समर्थन करण्यामध्ये, पुरोगामी महाराष्ट्रातील पुरोगामी नागरिकांनी पुढाकार घेतल्यास जातीय हिंसाचार रोखण्यात महाराष्ट्र निश्चितच आघाडी घेईल.

❑

### आंतरजातीय/धर्मीय लग्न

आंतर जातीय किंवा आंतर धर्मीय लग्नांना आजही फार मोठ्या प्रमाणावर विरोध होत आहे. त्यातूनच देशभर विविध ठिकाणी घराण्याच्या इज्जतीच्या नावाखाली अनेक मुला-मुलींचे खून केले गेले आहेत. कोल्हापूरच्या भारतीय महिला फेडरेशनने आंतरजातीय/धर्मीय विवाहांना समर्थन देण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. त्याविषयी पुढच्या अंकात.

वाचकांपैकी कुणाला यासंदर्भात आपले अनुभव लिहून पाठवायचे असल्यास जरूर पाठवा.

वा
च
कां
सा
ठी
आ
वा
ह
न

*विविध विषयांवर चर्चेसाठी जिव्हाळा एक मंच असावा असं आम्हाला नेहमीच वाटत आलं आहे. सुलोचना वाणी या जिव्हाळ्याच्या नियमित वाचक आहेत. त्यांच्या पत्राचा सारांश वाचकांसाठी खाली देत आहोत. त्यामध्ये त्यांनी काही प्रश्न उभे केले आहेत. गेल्या काही वर्षांपासून सॉफ्टवेअरच्या कंपन्या आणि कॉल सेंटर मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आहेत आणि त्यामध्ये मोठ्या पगाराच्या नोकऱ्याही शिकलेल्या मुलींना मिळू लागल्या आहेत. पण या संधींबरोबरच मॅटर्निटी लीव्ह आणि कामाच्या वेळांमध्ये सवलतीची मागणी मात्र तेवढा जोर लावून केली जाताना दिसत नाही.*

*आम्ही जिव्हाळ्याच्या वाचकांना आवाहन करीत आहोत की त्यांनी पुढील विषयावर आपले विचार अनुभव, अडचणी किंवा मतं थोडक्यात लिहून पाठवावीत. या विषयावर आपण काही काम केलं असल्यास त्याची माहितीदेखील इतर वाचकांना उपयोगी ठरेल.*

**स्त्रियांसाठी बाळंतपणाची रजा आणि लहान मुलांसाठी पाळणाघरं**
**या मागण्या प्रत्यक्षात कधी येणार?**

**आपली मतं/विचार तथापिच्या पत्त्यावर जरूर पाठवा. निवडक प्रतिक्रिया अंकात छापण्यात येतील.**

प्रति संपादक,

जिव्हाळ्यामधून स्त्रियांच्या विविध शारीरिक तक्रारींबद्दल आपली माहिती चांगली असते. कॅन्सरसंबंधी सुद्धा आपण वेळोवेळी माहिती दिली आहे. त्या संबंधात आपण पुन्हा एकदा लिहावे असे वाटते. स्त्रियांना होणाऱ्या कॅन्सरमध्ये गर्भाशयाचे आणि छातीचे कॅन्सर फार उशीरा लक्षात येतात. कारण याबाबत बोलायला स्त्रियांना संकोच वाटतो. रोगाच्या भीतीने कोणी बोललेच तर ती जणू लैंगिकतेविषयी बोलते आहे अशा दृष्टीने पाहिले जाते. त्या पलिकडे जाऊन तपासणी करण्याइतके बळ तिच्याकडे उरत नाही. माझ्याच बहिणीने तिच्या छातीत लागणाऱ्या गाठीविषयी सासूला सांगितले असता त्या म्हणाल्या होत्या, होत असतात दुधाच्या गाठी. आता छाती उघडी टाका आणि सांगा घरता सर्वांना. ती शरमून गेली आणि परिणाम व्हायचा तोच झाला. शेवटच्या स्टेजला कोणी काही करू शकत नाही. असो.

तर त्यानंतरच्या काळात म्हणजे १९९०-९५ च्या आधीच्या काळात, या रोगाच्या उपचारासंदर्भात मार्गदर्शनपर बरेच लेख यायचे. विशेषकरून स्तनाच्या कर्करोगासंबंधात स्त्रियांनी मूल अंगावर पाजल्यास कॅन्सर होण्याला प्रतिबंध होतो आणि अंगावर पिणाऱ्या मुलामध्ये रोगप्रतिबंधक शक्ती आपोआप येऊन मूल निरोगी राहते. त्या काळात पुरोगामी स्त्री संघटनांच्या मागण्यांमध्ये, मॅटर्निटी लीव्ह अनिवार्य असावी व कामाच्या ठिकाणी पाळणाघरांची सोय असावी या मागण्या प्रामुख्याने असायच्या.

बदलत्या औद्योगिक वातावरणामुळे स्त्रियांना विषेशतः आय टी मधील स्त्रियांना पगार पुरुषांच्या बरोबरीने म्हणजे लाखात मिळतो. या समानतेमागे प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता हेही कारण असू शकेल. पण या समानतेबरोबर मॅटर्निटी लीव्हची अनिवार्यता पण गेली. मूल लहान असताना फ्लेक्सिबल ऑफिस अवर्सची मागणी तर आधीच गुंडाळली गेली होती.

नव्या औद्योगिक वातावरणामध्ये वर्तमानपत्रातून सुद्धा स्त्रियांसाठी स्पेशल पुरवण्या निघतात. त्यात बाकी सर्व विषय असतात तरी मॅटर्निटी लीव्ह, पाळणाघरे या विषयांना स्पर्शदेखील केलेला नसतो.

आय टी क्षेत्रातील ड्यूटी बारा बारा तास असते. कधी रात्रीची ड्यूटी असते. बाळंतपणासाठी सुद्धा गॅप परवडत नाही. म्हणून पगार हवा तेवढा घ्या पण या विषयावर बोलू नका. वर्तमानपत्रातूनसुद्धा चर्चा नको अशी काही पार्श्वभूमी आहे का?

जिव्हाळ्यामध्ये या विषयावर चर्चा होईल का?

सुलोचना वाणी
१४, महेशनगर, पिंपरी, पुणे ४११०१८

# जिल्हा परिषद काय म्हन्ती?

पा र गा व च्या पा रा व रु न

*नमस्कार मंडळी. पारगावच्या पारावरून बाबीचा रामराम. म्हंजे त्येवडा येळ हाय न्हवं तुमच्याकडं, नमस्कार घालन्याएवडा? नाही म्हन्लं तुमी बी विलेक्शनच्या घाईत असचाल तर इचारलेलं बरं.. आहो निवडणूका लागल्यापसून वाईच चार घटका बोलायला बी आजकाल कुनाकडं येळ न्हाई. पन इच्छूकांना सोडून बरंका. इच्छूक बिचारे कितीबी येळा नमस्कार घालायला तयार हाईत. लोकशीहीतल्या ह्या सनाची धांदल तुमच्याबी गावात उडाली आसलंच की. आता आमच्या गावात एवडा गोंधळ आसून कमळी मंजूळी मात्र ऊन खात बसल्या हाईत वट्ट्यावर. चला ऐकू त्यांच्याच गप्पा.*

क. काय थंडी पडलीया मंजुळे. यवडी थंडी कधीच बघितली न्हाई माय.

मं. न्हाई तर काय. आगं वाकळीमदून भाईरच पडावं वाटत न्हाई बग.

क. पन कामं कोन करनार मग? सकाळी सकाळी शेनामुतात हात घातल्याबगर जमतंय का? आसं गार लागतंय बग; इचारायलाच नगं.

मं. आमच्या तिकडं तर पाच मिनिटबी उशीर झालेला चलत न्हाई माय 'चा'ला. बारा महिने तेरा काळ ही आचारसंहिता लागूच आसतीया. बरं चार दिस झाले बोंबलायले... शिलिंडर गेलाय, शिलिंडर गेलाय. पर ह्यंच्या कानावर कायबी आदळत न्हाई.

क. कसं आदळंल? कानात निसत्या घोषणाच घुमत आसतील न्हवं. घरी कधी आले गं भाऊ रात्री?

मं. जसं काय तुला म्हाइतच न्हाई. चांगले साडे बारा वाजले व्हते न्हवं.

क. टांग्यातून आले होते वाटतं.

मं. व्हय. फुकटचा हाय म्हनल्यावर कोन बसनार न्हाई. तुमचा पाळणा कधी उतरला?

क. योक वाजता. पलंगावर पडले तरी भाषण चालू होतं. बंधू भगिनीहो, आमच्यावरच शिक्का मारा. आत्या लई कावल्या होत्या. भायेरूनच वरडल्या. कमळे, ह्याचा शिक्का संपला न्हाई तर आता बुक्काच घाल बग त्येला.

मं. न्हाई तर काय. 'आदुगरच नवरे त्यात निवडणुका' अश्शी तऱ्हा झाली हाय ह्यांची. माझं तर म्हननं हाय ह्या नवऱ्यांना लोकपालाच्या कक्षेतच आणायला पायजेल. थांब आण्णालाच सांगते.(हसतात)

क. मी तर एकदा आमच्या ह्यांना शाप सुनावलं, 'तुमी गप सुधरा न्हाईतर त्या टीवीवाल्या वागळेच्याच तावडीत देते. कोनाला बी सुतासारखं सरळ करतंय ते.'(परत हसतात)

मं. आगं आमच्या ह्यांच्या तर बोलण्यातच फरक पडलाय. कालचीच गोष्ट. माज्या इलेक्शन कार्डात नवऱ्याच्या नावाच्या जागी कुठलं तरी भलतंच नाव आलंय. तर म्हन्ले, 'हे माझ्या इरुद्ध राजकीय षडयंत्र हाय.' ते ऐकून आमचे दादा ह्यांना म्हनले, 'तुज्या त्या यंत्रानं एवडं पानी तापतंय का बग.' मला तर हासूच आवरलं न्हाई.

मं. पर काई म्हन या निवडणूकांनी निस्ता ऊत आनलाय बग आख्ख्या गावात. माणसं इचारू नका, पोरंसोरं इचारू नका, आगं बाया बी येड्या झाल्यात बग या निवडणूकीपाई.

क. आगं परवाचीच गोष्ट. तुमच्या आळीतला राम्या आल्ता आमच्या घरी. त्येनं आत्याचं पायच धरून ठेवलं होतं पाच मिन्टं. म्हन्ला, 'मावशी तुमी हो म्हनचाल तरच मी निवडणूकीला उभा राहनार हाय. आन तुम्ही कौल दिल्याबगर तुमचं पाय बी सोडनार न्हाय.'

मं. मग?

क. आता म्हातारी हो म्हन्ती न्हाई तर काय करती. तिची परसाकडंला जायची येळ झालती ना. हो म्हनल्या आन झाल्या मोकळ्या.



मं. काय सांगतीस? आमच्याकडं बी आल्तं की ते ध्यान. म्हंजे हा हरएक घरात जाऊन समद्या म्हाताऱ्या मानसाईला पकडत असणार.

क. मग काय. बरं आमच्या आत्यांची पंचाईत होऊन बसली गं. आदल्या दिशीच वरच्या आळीतल्या सोमनाथला शब्द देऊन बसल्या होत्या ना.

मं. कसला?

क. आगं तो बी उभा राहनार हाय ना. तो बी आला होता तुम्हाला फुकटात माहूर कोल्हापूर करून आणतो म्हणून. आता माहूर कोल्हापूर रद्दच झालं म्हनायचं. बरं आपल्या सरपंचाची आयडिया बगितलीस का?

मं. ते चौकातल्या पोस्टरचंच बोलायलीस न्हवं. म्या वाचलं पर माज्या काय बी ध्यानात आलं न्हाई माय.

क. पर माज्या आलं की. पंचक्रोशीतल्या रुपयातल्या बाराने लोकायनी जिला परिषदेला उभं रहान्यासाठी माज्या बाजूनं कौल दिला आशी जाहीरात करत फिरतोय त्यो समद्या गावांमधून.

मं. पर त्यनं कौल कधी आन कुटं घेतला?

क. आता ही आतली बातमी हाय. तुला म्हनून सांगते. कौल घेतला एका हाटेलात आन चांगलं चार लोकांचं मत घेतलं त्यनं. त्यातले बाराने लोकं म्हणजे त्या चारातील त्यो सोता एक आणि दुसरे दोन जणं. पर ते जाऊदे. कौल शंभर टक्के का न्हाई मिळाला हे इचार.

म. का?

क. कारण त्यो चौथा सोताच्या पैशानं पित व्हता.

मं. एवडी आतली गोष्ट तुला ग कशी म्हाईत?

क. आगं त्या बारान्यातला एक चाराना माज्या घरात झोपलाय न्हवं.

मं. ही निवडणूक म्हन्लं की मला तर भीतीच वाटती बाई. कधी कोन काय करंल त्यचा पत्ता न्हाई. पुरुष मानसं तर येड्यासारखंच करतेत. आगं काम करायला नगं, शिवारात जायला नगं. आन हे रात्री बेरात्री घरी येनं. मला तर उल्टीच

हूती बग त्या वासानं.

क. आगं पुरुष मानसंच न्हाई पोरं सोरं बी लई वाया चालली हाईत बग. काल ते सुभानरावाचं पोरगं रात्री झोकांड्या खात कुनाला तरी शिव्या देतच घरला आलं. ही गर्दी जमा झालेली. इचारलं तर कळलं परचारात गेल्तं. इरोधी उमेदवाराचा उद्धार करत होतं. आसली कसली लोकशाही आन आसली कसली तिची निवडणूक माय? बापानं अरसा बदडला म्हणून सांगते.

मं. आगं खाऊन पिऊन दिवसाचे दोनदोनशे देतेत म्हनं दर डोस्क्यामागं. दिवसा बाया आणि सांजच्याला पुरुष अशी कामंच वाटून दिलीत म्हनं परचाराची. रातीचा सैपाक गियपक करावा लागतंय ना बाईमानसाला म्हनून. डेली रोजानं दिडशेला बाई चाललीय आज. हाईस कुटं? शेतीकामात येवडा मिळतोय का.

क. इथं बी बाईला कमीच पैका का?

मं. काय म्हाईत. पुरुष जास्त जोरात परचार करत आसतील न काय. (हसतात)

क. पुरुष तर पुरुषच हाईत. तू बायांचं बग. ह्या पन्नास टक्के आरक्षनानं निवडणूकीपुरता बायांचा एकदम भावच वाढलाय.

मं. आगं आमच्या बचत गटाला तर लईच मागणी आलीया. समद्या पार्ट्यावाले येऊन गेले बग. कुनी म्हनतंय कुकर घ्या, कुनी म्हनतंय मिक्सर घ्या. आगं त्या आरगावात तर म्हनं एका बाईनं समद्या बायांला गंगावनंच वाटली. आता घरोघरची पोरं म्हनं दाढी मिशा खेळत फिरतेत रस्त्यांवर.

क. तुला मी सांगितलं न्हाई आदुगर पर आता सांगते. दोन दिसापूर्वीच सरपंचीन बाई घरला आल्या व्हत्या. आमच्या आत्याला म्हनल्या ही लुगडं बगा तुमच्या आंगावर कसं दिसतंया. वर म्हनत होत्या तुमच्या दोघींची नावं घेते परचाराच्या यादीत. दिवसाला खाऊन पिऊन शंभर रुपये. फकस्त सुनंला पाठवलं तरी चालंल. आत्या लई कावल्या. म्हनल्या, 'मला काय न्हान आलंय का माज्या डव्हाळजेवणाला आलीस लुगडं घेऊन, चल हो भाईर.' तुला तर म्हईतच हाय सरपंचीनीची सावली बी पोळती त्यंला.

मं. आगं जिला परिषदेच्या अध्यक्षानं शे देनशे नऊवाऱ्या आन सावाऱ्या पाठवल्यात सरपंचाकडं. आपली लक्ष्मीच सांगत व्हती. सकाळी झाडलोट करायला ही सरपंचाच्या वाड्यावर गेली तर हा ढीग लागलेला लुगड्यांचा माजघरात. सरपंचीनीनं चांगली पाचपंचीवीस लुगडी आपल्या माहेरी बी लाऊन दिलीत, लक्ष्मीच सांगत हुती.

क. आसंना का माय. आपल्याला काय तिच्या लुगड्यांचं. ती आज लुगडी नेसवंल उद्या फेडून घील. आपल्याला नगंच आसलं काय बी.

मं. न्हाई तर काय. आज डोक्यावर घेनारे आन् उद्याच्याला खाली आपटनारे हाइत माय समदे. आमच्या आळीवर तर लईच मेहेरबानी हाय सद्याच्याला. एरवी आमी कशात नगं पर निवडनूक आली की झाल्या यांच्या वाऱ्या सुरू. अन् निवडून बी येनार तोऱ्यात.

क. आगं परवा आमचे हे सांगायले व्हते, कुन्या गावात असलं मशीन आलं होतं, कोन्चं बी बटन दाबा, येकाच पार्टीला मत पडायचं. कसली भारी हाय न्हवं आयडिया.

म. आता? काय चेष्टा वाटायली का काय या लोकावाला? आपुन मत देताव, आपला उमेदवार निवडून आनताव, नीट नेकीनी लढवावी का निवडणूक? मला सांग कमळे, बाया बी करत असतील का गं असला गोंधळ?

क. करील एखादी, पर मला तर वाटतंय ह्या आरक्षणाचा बाईला फायदाच हुईल बग. लई बाया आता गरामपंचायत-जिला परिषदेत जातील आता. बायांच्या भल्यासाठीच हाय हे सगळं.

म. खरं हाय तुजं. पन ह्यो आसला गोंधळ घालायला बाईला जमंल का गं? आन आसला गोंधळ घालणारी बाई जरी निवडून गेली तरी ती काय काम करणार हाय? मला तर काय बी कळंत न्हाई बग.

क. म्हनून सांगते जास्त इचार करू नगं, काम कर. पुढच्या गरामपंचायतीला उभी ऱ्हा आन ह्यो गोंधळ आवर. बोल ऱ्हातीस का?

मं. काय बी काय बोलतीस. काल तू बी टांग्यात बसली होतीस का काय? (हसतात)

□

शरीरसाक्षरता

# गर्भाशय आणि गर्भ वाढवण्याची 'सेवा' भाड्याने?

*सरोगसी म्हणजे दुसऱ्या कुणाचे तरी मूल आपल्या गर्भाशयात वाढवणे आणि जन्माला घालून त्याच्या पालकांना देणे. थोडक्यात म्हणजे आपले गर्भाशय आणि गर्भ वाढवण्याची सेवा भाड्याने देणे. गुजरातमधील आणंद आणि सुरत, महाराष्ट्रात मुंबई आणि आता पुणे ही अशा सरोगसीची महत्त्वाची केंद्रं बनत आहेत. २००८ साली केंद्र सरकारने सरोगसीवरील नियंत्रणासंबंधी विधेयकाचा मसुदा तयार केला होता आणि आता डिसेंबर २०१२ मध्ये महाराष्ट्राच्या विधानसभेतही भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांनी खाजगी विधेयकाच्या स्वरुपात एक विधेयक सादर केले आहे.*

*सरोगसी म्हणजे नक्की काय, त्यातील कायदेशीर आणि नैतिक बाजू तसंच त्यात सहभागी असणाऱ्या स्त्रियांच्या हक्काचा विचार कसा करायचा यावर मंथन करणारा हा लेख.*

आमीर खान आणि त्याच्या पत्नीने सरोगसीच्या आधारे एका मुलाला जन्म दिला. सरोगसी म्हणजे नक्की काय यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. याआधी एका महिलेने स्वतःच्या मुलीसाठी दोन जुळी मुलं आपल्या गर्भाशयात वाढवली आणि जन्माला घातली. तसंच एका जपानी दांपत्याने त्यांच्या बाळासाठी एका रुग्णालयासोबत करार केला. त्यांचा मुलगा मान्जी यामादा जन्माला आला. मधल्या काळात या जपानी दांपत्याचा घटस्फोट झाला आणि त्यामुळे या बाळाचा ताबा कुणाकडे द्यायचा यावरून गदारोळ उठला होता. तेव्हा अशा प्रकारे सरोगसीतून जन्माला आलेल्या मुलांबाबत काही चर्चा झाली. आणि चर्चा या सर्व करारांमध्ये ज्या स्त्रिया सहभागी होतात त्यांच्या हक्कांचीही झाली.

प्रजननासाठी साह्य करणाऱ्या तंत्रांचा वापर वाढत आहे आणि भारत हा अशी तंत्रं स्वस्तात पुरवणारा देश म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. पैसा कमवण्यासाठी सरोगसी आणि प्रजननासंबंधी इतर तंत्रांचा मोठ्या प्रमाणावर वापर होतोय आणि अनेक छोट्या मोठ्या शहरात असे व्यवहार करणारे दवाखाने आणि रुग्णालयांची संख्या वाढत चालली आहे. सरोगसीसंबंधी लोकांमध्ये पुरेशी चर्चा झालेली नाही आणि अशात त्यावर नियंत्रण करणाऱ्या विधेयकाचा मसुदा जाहीर झाला आहे. या मसुद्यामध्ये असंख्य त्रुटी आहेत आणि त्यातील काही तरतुदी वादग्रस्त आहेत.

आपल्या देशात मानवी अवयवांचे प्रत्यारोपण कायदा १९९४ अंतर्गत कोणत्याही मानवी अवयवाच्या विक्रीवर बंदी आहे. तरीही सरोगसीच्या माध्यमातून गर्भाशय भाड्याने देण्याच्या व्यवहाराला चालना दिली जात आहे. हा व्यवहारही क्लिष्ट आणि धोकादयक असला तरी नफेखोरी करणाऱ्या वैद्यक व्यवसायाने त्याचा पुरेपुर फायदा उठवला आहे आणि परदेशी जोडप्यांसाठी भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर 'प्रजनन पर्यटन' नव्याने सुरू झाले आहे. आपल्या इथे मूल न होणे किंवा वंध्यत्व ही प्राधान्याने आढळणारी समस्या नाही. लोकसंख्येतील एकूण १०% जोडप्यांना मूल न होण्याची समस्या आहे. कारण यातल्या बहुसंख्य जणींना योग्य प्रमाणात आरोग्याच्या, पोषणाच्या आणि गरोदरपण-बाळंतपणाच्या सेवा मिळत नाहीत तसंच प्रजननमार्गाला होणाऱ्या जंतुलागणीचं प्रमाणही प्रचंड आहे. चांगल्या दर्जाचे पोषण आणि उत्तम आरोग्यसेवांमधून या समस्येला आळा घालता येऊ शकतो. केवळ २ ते ३% जोडप्यांना प्रजनन तंत्रज्ञानाची गरज भासू शकते.

आपलं मूल आपल्या रक्ताचं आणि पुढे जाऊन आपल्या वंशाचं, आपल्याच जनुकांचं असावं या मानसिकतेवर पूर्ण प्रजनन तंत्रज्ञान आधारलेलं आहे. याच मानसिकतेमुळे दत्तक घेण्याचा पुरोगामी आणि कमी खर्चिक पर्यायही मागे पडला आहे.

सरोगसीचं विश्लेषण करताना पहिला मुद्दा असा आहे की या प्रक्रियेने नैसर्गिकरित्या होणाऱ्या प्रजननाची तीन प्रकारे विभागणी केली आहे. मूल वाढवणारे पालक, गर्भ पोटात वाढवून जन्माला घालणारी आई आणि गर्भाच्या फलनासाठी बीजं देणारे जनुकीय घटक. या व्यवहारातील जे जे भागीदार आहेत त्या प्रत्येकाचे हिंतसंबंध वेगवेगळे आहेत. उदा. ज्यांना मूल हवं आहे ते पालक, सरोगेट झालेली स्त्री आणि असल्यास तिचं कुटुंब, जन्माला आलेलं बाळ आणि धंदेवाइक एआरटी दवाखाने आणि शुक्राणूंच्या पेढ्या या सर्वांचे हिंतसंबंध भिन्न आहेत. व्यवहार नीतीला धरून करायचा असेल तर सरोगेट झालेल्या स्त्रियांचे अनुभव लक्षात

घ्यायला हवेत. मुख्यतः पैशाच्या गरजेमुळे यात सहभागी होणाऱ्या स्त्रियांना अशा गरोदरपणामुळे मोठ्या प्रमाणावर मानहानी सहन करावी लागते. घर सोडून वेगळीकडे रहावं लागतं किंवा पोटातलं मूल जन्मल्यावर मरण पावलं असं खोटंही बोलावं लागतं.

ही सगळी लपवाछपवी थांबवण्यासाठी शासनाने हस्तक्षेप करून विश्वासाचं वातावरण निर्माण केलं पाहिजे. सरोगसीसाठी नोंद करणाऱ्या बाया स्वतःहून असा निर्णय घेण्याची किंवा त्यांना समान हक्क असण्याची शक्यता कमी आहे; हे लक्षात घेऊन त्यांना या सर्व कराराची पुरेशी माहिती देऊन त्यांची संमती घेण्यात यावी, त्यांना गरजेप्रमाणे समुपदेशन आणि करार करण्यासंबंधी कायदेशीर मदत मिळेल अशी यंत्रणा उभी करायला पाहिजे. तसंच त्यांना मिळणारा मोबदला आणि आरोग्याचा विमा याबाबतही शासनाच्या प्रस्तावित नियंत्रक समितीने नियम घालून दिले पाहिजेत. सरोगेट स्त्रीला गर्भपात करण्याचा आणि तिची इच्छा असेल तर मूल स्वतः वाढवण्याचा हक्कही मिळायला पाहिजे. बाळाच्या जन्म दाखल्यावर तिचं नाव असावं आणि नव्या पालकांना त्यानंतर पालकत्वाचे अधिकार दिले जावेत. तिच्या घरच्यांना करार करणाऱ्या पालकांची माहिती असावी आणि तिच्या गरोदरपणातील सर्व उपचारांमध्ये त्यांचा सहभाग असावा.

पितृत्व ठरवण्यासाठी किंवा नातं सिद्ध करण्यासाठी जनुकीय नात्यांचा आधार घेतला जातो. मुलाला वाढवताना घ्यावे लागणारे कष्ट यात लक्षात घेतले जात नाहीत. सरोगेट झालेल्या स्त्रीला किती मोबदला द्यायचा हाही एक वादाचा मुद्दा आहे. कारण एक मूल जन्माला घालायची किंमत किती आणि कशी ठरवणार? पाश्चिमात्य देशांमध्ये एकूण खर्चाच्या जवळ जवळ ५०% रक्कम सरोगेट बाईला मिळते. भारतात मात्र मोठा वाटा एआरटी क्लिनिक, शुक्राणू पेढी आणि वकिलांच्याच खिशात जातो असं चित्र आहे.

यामध्ये अजून एक घटक लक्षात घेतला पाहिजे. सरोगसीतून जन्मणाऱ्या बाळाच्या बाबतही नकळत भेद केला जातो. हे मूल देऊन टाकायचं आहे हे आधीपासून माहित असल्यामुळे त्याच्याबद्दल कमीत कमीत ओढ आणि जवळीक निर्माण व्हावी यासाठी समुपदेशन केले जाते. जन्मल्या जन्मल्या बाळाची जन्मदात्या आईपासून ताटातूट केली जात असल्यामुळेही त्याच्या भावनिक आरोग्यावर तर परिणाम होतोच पण आईच्या दुधातून मिळणारी प्रतिकार शक्तीदेखील त्याला नाकारली जाते. हा मुद्दा सरोगसीबाबतच्या चर्चेमध्ये घेतला जात नाही. सरोगसीमध्ये एकाहून अधिक गर्भ तयार होऊ शकतात आणि जुळी किंवा त्याहून अधिक बाळं जन्माला येऊ शकतात. तसंच गर्भामध्ये काही व्यंगंदेखील असू शकतात. पण या सर्वांनाच जगण्याचा आणि योग्य ते उपचार, सेवा मिळण्याचा समान अधिकार असला पाहिजे. शासनाच्या मसुद्यात पालकांना गर्भांची संख्या कमी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. तो मात्र या अधिकारांच्या विरोधात जातो.

सध्या जे व्यवहार किंवा करार होत आहेत त्यामध्ये मूल हवं असणाऱ्या पालकांचा सरोगेट स्त्रीच्या गरोदरपणात आणि बाळंतपणात कसलाही सहभाग नसतो. हे चित्र बदलून त्यांचा मूल होण्याच्या आणि त्याचा ताबा मिळण्याच्या सर्व प्रक्रियेत सक्रीय सहभाग असायला हवा. जन्म देणाऱ्या आणि मूल वाढवणाऱ्या दोन्ही पालकांचा सुरुवातीपासून सहभाग असेल तर पितृत्व किंवा रक्ताच्या नात्यापलिकडे जाऊन पालकत्वाची नवी नाती तयार होण्यास मदत होऊ शकेल. पालक समलिंगी असोत अथवा भिन्नलिंगी, विवाहित असोत अथवा एकटे; त्यांना अशी नाती फुलवता येतील. भारतातल्या समलिंगी जोडप्यांना किंवा विवाहित नसणाऱ्या स्त्री पुरुषांनाही सरोगसीचा लाभ मिळाला पाहिजे. दत्तक कायद्यांमध्येही सुधारणा करायला हव्यात जेणेकरून सर्व धर्माच्या व्यक्तींना दत्तक पालक होता येईल.

स्टेम सेल संशोधन आणि क्लोनिंग करता येण्याची शक्यता असल्याने एआरटीचे (असिस्टेड रिप्रोडक्टीव्ह टेक्नोलॉजी) जोरदार समर्थन करण्यात येते. शासनाच्या प्रस्तावित मसुद्यातही सरोगसी म्हणजे 'एआरटीच्या साह्याने निर्माण झालेले गरोदरपण' अशीच व्याख्या करण्यात आली आहे. त्यामध्ये अशा व्यवहारांमध्ये होत असलेले अनैतिक प्रकार आणि शोषण याचा विचारही करण्यात आलेला नाही. शासन दरबारी आणि समाजामध्ये या काही मुद्द्यांवर विचारमंथन व्हायला हवं. जन्माणाऱ्या बाळाचं हित कसं जपलं जाईल? सरोगेट स्त्रीचे अधिकार काय आहेत आणि त्याचं रक्षण कसं करायचं? मूल हवं असणाऱ्या (दत्तक) पालकांची भूमिका काय असावी? या तिन्ही घटकांचा विचार करून नीती ठरवण्यात यावी.

आजच्या विज्ञान आणि जागतिकीकरणाच्या युगात पुरुषसत्तेवर आधारित कुटुंबसंस्थेला आणि मूल न होण्याबाबत असणाऱ्या कलंकाला एक पर्याय म्हणून सरोगसीचा विचार करता येईल. मात्र त्यातून पुन्हा एकदा आपल्या रक्ताचं मूल ही धारणा मूळ धरू नये.

*(समा या दिल्लीतील संस्थेच्या ब्लॉगवर इम्राना कदीर आणि मेरी जॉन यांनी लिहिलेल्या पोस्टच्या आधारे)*

अ नु भ व

# ज्योतीची गोष्ट

मध्य प्रदेशातील होशंगाबाद जिल्ह्यात चंदपुरा नावाचं दोन एकशे उंबऱ्यांचं लहानसं खेडं आहे. जिल्ह्याच्या ठिकाणापासून तसं जवळंच, १५ ते २० किलोमिटर अंतर असेल. नर्मदेच्या अगदी काठावर वसलेलं होशंगाबाद शहर. नर्मदेनं हा सर्व प्रांत एका अर्थाने अगदी सुपीक आणि संपन्न केलेला आहे. पंधरा वीस फूट खोदलं तरी पाणी लागतं. कधी कधी पाणी नको अशी परिस्थिती या भागात असते. शिवाय तवा नदीवरील धरणामुळं सिंचनाची चांगली व्यवस्था काही भागात झालेली आहे. शेती हाच मुख्य व्यवसाय असं मानायला काही हरकत नाही. सालात तीनतीन पीकंही काही शेतकरी घेतात. अर्थात ज्यांच्याकडे जमीन आहे ते.

तथापि च्या आरोग्य कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यक्रमासाठी या गावाची निवड स्थानिक संस्थेने केली तेव्हा गावात प्रशिक्षणासाठी योग्य अशी स्त्री मिळणं तसं अवघडच गेलं. गावांमध्ये जाती व्यवस्था भक्कम. मुख्यतः वर्मा, साहू या जमीनधारक ओबीसी जातींचं गावात वर्चस्व. शिक्षित असूनही स्त्रियांचं घराबाहेर पडणं मुश्कील. जी काही दलित आणि इतर जातींची घरं होती ती वर्षभर मोलमजुरीच्या मागे. अशा परिस्थितीत गावच्या आंगणवाडी कार्यकर्तीने ज्योतीचं नाव या कार्यक्रमासाठी सुचविलं.

चंदपुरा ज्योतीचं माहेर आहे. ती आपल्या आईवडीलांसोबत राहते. ती सासरी राहत नाही. लग्नानंतर सहा सात महिन्यातच तिच्या नवऱ्याने तिला माहेरी आणून सोडलं ते न घेऊन जाण्यासाठीच. तिच्या माहेरच्यांनी नंतर बरेच प्रयत्न करून पाहिले त्यांचा संसार नीट चालावा म्हणून, पण सगळं व्यर्थ गेलं. तसं तर तिची सुद्धा परत सासरी जाण्याची इच्छा राहिली नव्हती आणि नंतर नंतर ती पूर्णच संपून गेली. या अर्ध्या वर्षाच्या काळातच तिने सगळ्या प्रकारच्या छळ आणि शारीरिक मानसिक हिंसेला तोंड दिलेलं होतं. तिला आणून सोडलं तेव्हा तिचे दागिनेही सासरकडच्यांनी काढून घेतले होते.

यातच ज्योतीला भोपाळच्या एका मानसोपचार तज्ज्ञाचीही मदत घ्यावी लागली. त्यांनी डिप्रेशन आलं आहे असं सांगितलं. दर महिन्याला दीड हजाराची औषधं; वर भोपाळला मारायच्या चकरा यात ज्योतीला बरंच सहन करायला लागलं. मधल्या काळात नवऱ्याने घटस्फोट घ्यायचं ठरवलं आणि तो कोर्टात गेला. शेजारीपाजारी आणि नातेवाईकांचे टोमणे आणि टोचून बोलणं याला तर काही पर्यायच नव्हता. या सगळ्या परिस्थितीत ज्योती पारच खचून गेली.



ज्योती बारावी पास आहे. पुढे शिकायची इच्छा असूनही लग्नामुळे शिकू शकली नाही. ती हुशार आहे आणि अंगी काहीतरी करण्याची धमकही आहे. पहिले दोन ट्रेनिंग ती गप्प गप्प आणि अलिप्तच असायची. पण हळूहळू ती पार बदलून गेली.

कार्यक्रमाची दोन वर्ष संपली आणि तब्बल ४० दिवसांचं ट्रेनिंगही पार पडलं. संजीवनी आता गावात औषधं देतात, पेशंट तपासतात आणि गरज असेल तिथे संदर्भ सेवाही पुरवितात. ज्योतीने एकही प्रशिक्षण चुकविलेलं नाही. एसएनडीटीमार्फत घेण्यात आलेली आरोग्य कार्यकर्तीची परीक्षाही तिने दिली आहे.

'मी माहेरच्यांना माझं कधीच ओझं वाटू दिलं नाही. टेलरिंगचं काम करून मी माझा खर्च भागवते. डॉक्टरांच्या सल्ल्याने माझ्या सर्व गोळ्या मी हळूहळू कमी केल्या आहेत. आता मला एक पैसाही या औषधांवर घालवायची गरज नाही. सध्या मी जवळच्या गावातच कम्प्यूटरचा कोर्स लावला आहे आणि नुकतीच प्राथमिक शिक्षकाची परीक्षाही दिली आहे. खरं तर मला या वर्षी पोलीस भरतीसाठी परीक्षेला बसायचं होतं. पण घरी काही अडचणी आल्या. पण पुढच्या वर्षी मी ती संधीही नाही सोडणार. तुम्ही माझ्या घरी येऊन जरा घरच्यांशी बोलाल का? ती विचारत होती.

ज्योती सारख्या जवळपास दीडएकशे स्त्रिया अनेकाकानेक अडचणींना तोंड देत मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि छत्तीसगढ या तीन राज्यात आपापल्या गावात आरोग्य कार्यकर्तीचं काम करत करत आपल्या आयुष्यालाही एक नवं वळण द्यायचा प्रयत्न करत आहेत. त्या विषयी पुन्हा कधी तरी...

# तथापिची प्रकाशने सवलतीत उपलब्ध

*सन २००० पासून तथापि ट्रस्ट स्त्रिया आणि आरोग्याच्या विविध विषयांवर साधी सोपी आणि स्त्री संवेदनशील संसाधने तयार करीत आहे. राज्यभरातल्या अनेक संस्था संघटनांपर्यंत ती पोचवण्याचा आमचा कायम प्रयत्न राहिला आहे. आमची अनेक प्रकाशने आम्ही पुढील सहा महिने सवलतीच्या दरात उपलब्ध करून देत आहोत. तरी वाचकांनी याचा जरूर लाभ घ्यावा.*

***पुढील सर्व साहित्य ५०% सवलतीत उपलब्ध आहे***

प्रक्रिया नोंद कशी करावी? (पुस्तिका) (रु.१०)

स्त्रिया आणि आरोग्य: काही उपयुक्त संसाधने (इंग्रजी/मराठी) (रु.५०)

स्त्रिया आणि मानसिक आरोग्य ... एक सुरूवात (इंग्रजी) (रु.२५)

स्त्रियांमधील रक्तपांढरी (पुस्तिका) (रु.१०)

लोकसंख्या प्रश्नः गरिबीचं कारण की गरिबीचा परिणाम? (पुस्तिका) (रु.५)

**साद आरोग्याची माहितीपत्रके** - (रु.१५ प्रत्येकी)

१. स्त्रिया आणि रक्तपांढरी

२. स्त्रियांवरील हिंसाः सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न

३. प्रजननमार्गाचा फिस्टुला

४. गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया

पाळीचक्रात काय घडत आहे? (इंग्रजी/मराठी/हिंन्दी) (रु.२५)

स्त्रियांच्या अधिकारांचा जाहिरनामा-सीडॉ करार (पुस्तिका) (रु.१०), पोस्टर्स -३ चा संच (इंग्रजी/मराठी) (रु.३०)

**हिंसाचार – सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न**

पुस्तिका (इंग्रजी/मराठी) (रु.२५), फ्लिपचार्ट (इंग्रजी/मराठी) (रु.१५०)

आधार-हिंसाविषयक मदत व मार्गदर्शन सूची (पुणे जिल्हा) (रु. ६)

तुमच्या बाबतीत असं घडतंय? (दवाखान्यामध्ये लावण्यासाठी पोस्टरचा संच) (रु.२०)

हिंसामुक्त घर, प्रत्येक स्त्रीचा अधिकार (पोस्टर)(रु.१०)

स्त्रियांवरील हिंसा : बदलते स्वरुप, बदलती आव्हाने-महाराष्ट्रातील स्त्रियांवरील हिंसाविरोधी कामाचा आढावा (रु.२०)

**पुरुषांसोबत लिंगभेद आणि लैंगिकतेविषयी उपक्रम**

लैंगिकता पुरुषांची व जडणघडण पुरुषत्वाची (३ कार्यशाळांचे अहवाल, २०००-०२.) (इंग्रजी/मराठी/हिंन्दी) (रु.१५ प्रत्येकी)

लिंगभाव, लैंगिकता, हिंसाचार आणि आरोग्य-पुरुषांसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका (इंग्रजी/मराठी/हिंन्दी) (रु.२००)

पुरुषांसोबत संवादासाठी दोन पोस्टर्स (पोस्टर १ व २) (रु.१० प्रत्येकी)

तोड मर्दा तोड ही चाकोरी - पुरुषत्वाच्या चौकटी मोडू पाहणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या काही गोष्टी (इंग्रजी/मराठी) (रु.२०)

समानतेच्या दिशेने : पुरुषांसोबत काम या प्रकल्पासंबंधी दोन चित्रफिती

अ. पुरुषीपणा सोडूया.. माणूस म्हणून वाढू या... युवक मेळावा २००८-३० मिनिटे (मराठी) (इंग्रजी शीर्षकांसहित) (रु. ५०)

ब. आम्ही 'बि'घडलो.. पुरुषांसोबत काम : कार्यकर्त्यांचे अनुभव - २४ मिनिटे (मराठी, इंग्रजी शीर्षकांसहित) (रु. ५०)

समानतेच्या दिशेने : पुरुषांसोबत काम या प्रकल्पाचा अहवाल २००६-१०

आमची इतर लोकप्रिय प्रकाशने

मानवी शरीराचे आतील अवयव (शरीराचे कोडे : इंग्रजी/मराठी) (रु.१५)

आपल्या हातात -स्त्रियांसाठी सुपिकता व लैंगिकता कार्यपुस्तिका (इंग्रजी/मराठी) (झेरॉक्स प्रत उपलब्ध आहे रू.८०/-)

स्त्रिया आणि मानसिक आरोग्य ... एक सुरूवात (पुस्तिका) (मराठी) (झेरॉक्स प्रत मिळेल (रू.५०/-) (इंग्रजी सवलतीत उपलब्ध)

मुलांसाठी शरीर साक्षरता-३ पुस्तकांचा संच (इंग्रजी, मराठी) (१० वर्षावरील मुलांसाठी लिंगभाव संवेदनशील लैंगिकता शिक्षण) (रु.६० प्रत्येकी)

आपल्या रक्ताची लाली स्वतःच तपासा (आरसा तक्ता रक्तपांढरी ओळखण्यासाठी) (रु.१५)

गर्भलिंगनिदान गुन्हा आहे. गुन्ह्यात सहभागी होऊ नका (गर्भलिंगनिदान आणि पीसीपीएनडीटी कायदा याविषयी ५ पोस्टरचा संच) (रु.५०)

ॲज वुई सी इट - आरोग्य रक्षकांच्या जीवन कहाण्या

आपले शरीर = शरीरमान पोस्टर (मराठी/हिंदी) (रु.१०)

संजीवनी-स्त्रिया आणि आरोग्य प्रशिक्षण साहित्य संच (३० विषयांवरील प्रशिक्षण पुस्तक, फ्लॅशकार्ड व पोस्टरचा संच) (मराठी/हिंदी) (रु.६००) ***(नवीन)***

जिव्हाळा (त्रैमासिक वार्तापत्र) (वर्गणी रु.३५ एका वर्षासाठी; रु.१०० तीन वर्षासाठी)

# होळी रे होळी

*पुढच्या महिन्यात होळी येईल आणि दरवर्षीप्रमाणे सगळीकडे शिमगा साजरा होईल. प्रत्येक भागातील रीत वेगळी पण होळी आणि धुळवड दणक्यात साजरी होतेच. उत्तरेत होळीच रंगात न्हाऊन येते, पण महाराष्ट्रात मात्र रंगांसाठी रंगपंचमीचा वेगळा दिवस राखून ठेवला आहे. होळीच्या आरोळ्यांमध्ये, पेटलेल्या ज्वाळांमध्ये आणि धुळवड खेळताना कधी हा सण कसा साजरा व्हायला लागला याचा कधी आपण विचार केला आहे का? होळी आणि धुळवड या सणांचा हा थोडक्यात इतिहास. अर्थात यापलिकडेही सणांचे अर्थ असतील पण हे काही नोंदवलेले संदर्भ आणि त्याबाबत पडलेले काही प्रश्नदेखील.*

वसंत ऋतूत फाल्गुन पौर्णिमेला होळी साजरी करतात. या सणाच्या पौराणिक कथा अतिरंजित आहेत. एका कथेनुसार श्रीकृष्णाचा मामा कंस त्याला मारण्यासाठी पूतना राक्षसीला पाठवतो. ती राक्षसी आपले विषारी दूध कृष्णाला पाजून मारण्याचा प्रयत्न करते. परंतु कृष्ण दूध पिता पिता तिचे प्राण शोषून घेतो. तिचा देह त्या दिवशी जाळला जातो. तीच परंपरा आज होळीच्या स्वरुपात सुरू आहे. आणखी एका कथेनुसार ढोंढा नावाची राक्षसी गावामध्ये येऊन लहान मुलांना खाऊन टाकत असे. तिला पळवून लावण्यासाठी लोक मोठमोठ्या आगी लावत आणि राक्षसीला उद्देशून घाणघाण शिव्या देत. अशी पाशवी कृत्यं माणूस तेव्हापासून करत आहे हेच यावरून दिसते. तेव्हापासून होळीच्या दिवशी आवाज करत, बोंबा मारत, एकमेकांना स्त्रियांवरून, आया-बहिणींवरून शिव्या देण्याची प्रथा रूढ झाली आहे.

वेगवेगळ्या देशात होळीसारखे सण साजरे केले जातात. ज्यामध्ये लोक रोजचं साधं आयुष्य बाजूला ठेऊन बेताल वागतात, एकमेकांना शिव्या देतात आणि थोडा काळ का होईना आपल्या मनाला वाटेल ते करण्याचा आनंद लुटतात. पण हे करताना चांगली लाकडं, गोवऱ्या जाळणं, लाखो लोक उपाशीपोटी असताना पेटत्या होळीला पक्वान्नाचं ताट अर्पण करणं कितपत योग्य आहे बाईच्या इज्जतीचा मोठा गाजावाजा करायचा आणि होळीला मात्र बेताल शिव्या याचा अर्थ कसा लावायचा? का सण-उत्सवांचं फक्त अंधानुकरणच करायचं?

विचार करा आणि पर्यावरणाची हानी न करता, कोणाही बाईचा अपमान न करता आणि सगळ्यांना सहभागी करून होळी कशी बरं साजरी करता येईल? तुमच्या कल्पना आणि विचार नक्की कळवा.

*(संदर्भ : सणांचे कूळ, उत्सवाचे मूळ, ले. सुमन ओक, साधना प्रकाशन)*


**PRINTED MATTER**

**बुक पोस्ट**

**प्रकाशक**

**प्रति**

**तथापि ट्रस्ट**
४२५ डी पी- ७७, टिमवि कॉलनी,
मुकुंद नगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी : ०२० - २४२६०२६४; २४२६७९०८
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org



अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.


पारगावच्या पारावरुन चित्रः राजू देशपांडे


**जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक - रु. ३५, तीन वर्षासाठी - रु. १००** **खाजगी वितरणासाठी**